Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# दलित आत्मकथन जिणं आमुचं : शोध अस्तित्वाचा

**प्रा. शुभांगी किशोर लामसोगे**
Email Id – lamsogeshubhangi@gmail.com

---

***सारांश -***

*भारतीय समाज व्यवस्थेमधील पुरुषसत्ताक कुटुंब पद्धती असल्यामुळे स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळाले आहे, स्त्री ही कायमच एक उपेक्षित, दुर्लक्षलेली म्हणून तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सुद्धा तेवढाच मर्यादित आहे. त्यामुळे स्त्रिया ह्या आपल्या हक्कासाठी सन्मानासाठी झगडत असलेल्या दिसतात. स्त्री जर दलित समाजामधील असेल तर तिचे मोठ्या प्रमाणामध्ये शोषण केले जाते. कारण दलित स्त्री ही एक उपेक्षित असलेले जीवन जगत असते. दलित समाजामध्ये अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य, भूक इत्यादी अनेक समस्यांनी ग्रासलेली असते. अनेक समस्या, हालअपेष्टा स्त्रियांच्या वाट्याला येत असतात व ती मुकाट्याने सर्व सहन करीत असते. दलित स्त्री समाजाकडू , सवर्णांकडून धिक्कारलेली असते ,त्यामुळे तिचे शोषण नेहमीच समाजाकडून होत आलेले आहे. दलितांना शिक्षणाचा अधिकार नसल्यामुळे स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवल्या जाते व तिच्यावर अन्याय, अत्याचार करून माणूस असूनही जनावर आप्रमाणे ही वागणूक दिली जाते आणि ती कोणतीही तक्रार न करता जीवन जगत असते.*

*स्त्रीला नेहमीच दुय्यम वागणूक मिळाल्यामुळे ती पुरुषप्रधान संस्कृतीचे बळी ठरते. दलित स्त्रीला कुटुंबामध्ये सुद्धा दुय्यम स्थान असते. खरे तर भारतीय जातीव्यवस्था ही स्त्रियांचेस्त्री शोषण करण्यास कारणीभूत आहे. स्त्री ही कितीही कौशल्यवान असली तरी पुरुषांच्या अहंकारामुळे तिचे कर्तुत्व दाभल्या जाते व त्यामुळे स्त्रियांच्या वाट्याला आपोआप कनिष्ठता, दुय्यमता प्राप्त होते.*

***बीज शब्द** - दलित, आत्मकथन ,समाज, पुरुषप्रधान, शिक्षण, जातीव्यवस्था, स्त्री*

---

**प्रस्तावना** –

दलित स्त्रियांची आत्मकथने ही त्यांच्या दुःखाची, सहनशीलतेची, जाणीवाची समाजाकडून मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीची कर्म कहाणी आहे. व्यक्ती आणि गुंतागुंतीच्या संपूर्ण नात्यांच्या अंतरंगातून प्रकाश टाकून समीकरण करून व्यक्तीच्या खाजगी आयुष्याच्या व सह जाणिवांच्या जडणघडणीचे आकलन इतरांसमोर मांडने म्हणजेच आत्मकथन होय. अंतर्मुख पातळीवरील चिंतनशीलता आणि प्रांजल आत्मकथन हे दलित आत्मकथनाचे महत्त्वाची विशेष आहे. याच पार्श्वभूमीवर दलित स्त्रिया आत्मकथा लिहितात तेव्हा त्यांची भूमिका निराळी दिसते. दलित आत्मकथन मागील स्त्री ही लढाऊ आणि सामजश्याची भूमिका घेऊन आलेली दिसते. हे सामंजस्य तिच्यावर सभोवतात असलेल्या जगण्याच्या संघर्षातून निर्माण होत असते. म्हणून श्री पवार म्हणतात की " दलितेतर लेखक आणि दलित लेखक यांचा अनुभव घेण्याच्या शक्तीत फरक आहे . दलितेतरांचा अनुभव संकल्पनात्मक असतो तर दलित लेखकाचा अनुभव संवेदनात्मक असतो."१ दलित साहित्यामधून संवेदनाच्या जाणिवेतून आत्मकथनाची निर्मिती होत असते. आत्मकथनाची निर्मितीची प्रेरणा देणारे डॉ. आंबेडकर यांच्या विचारांनी समाजामध्ये बदल घडवून आणण्यासाठी आंबेडकरांनी केलेले कार्य, परिवर्तन स्त्रियांसाठी

आत्मभानाची प्रतीक बनलेले आहे. म्हणून स्त्रियांमध्ये आत्मसन्मान आत्मविश्वास आत्मा- अवलंबन कोणी निर्माण केले असेल तर ते आंबेडकरांनीच म्हणून बेबीताई कांबळे यांचा जिंण आमुचं हे आत्मकथन त्यांनी का लिहिले या मागची कारणमीमांसा करताना त्या म्हणतात की, माझे लेखन माझ्या लेकी, सुना, पोरीबाळी आणि पुढच्या पिढ्यांसाठी आहे. आपण दलित आहोत यामध्ये लाज, शरम, कमीपणा का बाळगायचा? आपण आंबेडकरांच्या प्रेरणेने कसे जागी झालो आणि प्रस्थापितांबरोबर कसे लढलो यांच्या स्पूर्तीदायक आठवणी पुढच्या पिढीला सांगायला हव्यात तेव्हाच कुठे दलित समाजामध्ये लढाऊ परंपरा कायम राहील असे त्यांना वाटते. स्त्रियांना त्यांचे हक्क, समानता मिळवून देण्यासाठी व तिला एक संपूर्ण व्यक्ती म्हणून सन्मान देता यावा यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाची मांडणी केली.

**वैयक्तिक परिचय** –

दलित चळवळीतील एक लढाऊ कार्यकर्ती, समाजसेविका म्हणून बेबी कांबळे परिचित आहेत जिंण आमुचं हे मराठी साहित्यातील स्त्रीचे पहिले आत्मकथन होय. त्याशिवाय बेबीताई यांचा 'मन बोलते' हा कवितासंग्रह ही प्रकाशित झालेला आहे, शिवाय त्यांनी इतर स्पूटलेखनही केलेले आहे. आपल्या आयुष्यभर त्यांनी आंबेडकर चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. दलित समाजातील मुला मुलींच्या शिक्षणाचे ध्येय समोर ठेवून त्यांनी निभुरे' येथे आश्रम शाळा सुरू केली .बेबीताई यांचा जन्म पुरंदर तालुक्यातील 'विरगाव' यांच्या आजोळी झाला. त्यांचे माहेरचे नाव बेबीताई पंढरीनाथ कांबळे होते. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय ठेकेदारी होता. आणि परोपकारी वृत्तीचे त्यांचे वडील होते त्यामुळे त्यांचा प्रभाव बेबी ताई पडला. बाबासाहेबांच्या प्रेरणेमुळे दलित समाजातील स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या त्यामुळे वयाच्या आठव्या वर्षी बेबीताई शिक्षणासाठी विरगावहुन 'फलटणला' आल्या. चौथीपर्यंतची शिक्षण 'बाहुलीच्या' शाळेमध्ये झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी 'मुधोजी विद्यालय' गाठले वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह कोंडीबा कांबळे यांच्याशी झाला.

दलित समाजातील भीषण वास्तव हे जिंण आमुचं या पुस्तकाचा गाभा आहे. बेबी ताईंनी स्वतःच्या दुःखापेक्षा समाजातील दुःख, दारिद्र्य, अंधविश्वास, प्रथा, परंपरा, अज्ञान, परिवर्तन यांचा लेखाजोगा आपल्या आत्मकथनामध्ये मांडलेला दिसतो. त्यांचे हे आत्मकथन जातीव्यवस्था, पितृसत्ताककुटुंब पद्धती, असमानता, कौटुंबिक हिंसाचार, लिंगभाव, यासंबंधी महत्वपूर्ण मांडणी केलेली दिसते. म्हणूनच "बेबी कांबळे यांचे आत्मकथन समाजशास्त्रज्ञ आणि इतिहासकारांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यांची भूमिका ललित लेखकाची नसून समाजशास्त्रज्ञाची आहे"[२] हे मत प्रा. वि. श .चौगुले यांनी व्यक्त केलेले आहे.

**जीवन जगण्यासाठी चाललेला दलितांचा संघर्ष -**

दलित हे नेहमी गावाच्या बाहेर वेशीवर राहात असत. दलितांना सुवर्णांचे विविध कामे करावी लागत उदाहरणार्थ शुभकार्यात लाकूडफाटा आणण्यापासून ते गु-घाण साफ करण्यापर्यंतची कामे त्यांना करावी लागत होती, मात्र कार्यक्रमांमध्ये सर्वांचे जेवण झाल्यानंतर जे पत्रावळीमध्ये उरलेले उष्टे, खरखटे अन्न त्यांना देण्यात येत असे. दलित गावांमध्ये रोज भिक मागण्याकरिता जात असत रात्रीचे अन्न त्यांना स्वर्ण भिक म्हणून देत असे, कधी-कधी तर आंबवलेले अन्न सुद्धा दलितांची मुलबाळ आनंदाने घरी घेऊन येत. घरी आणलेले अन्न एका गाडग्यामध्ये उकडायचे आणि ते सर्वांनी खायचे हा त्यांचा नित्यक्रम असायचा. दलित वर्गांना कधीही चांगले अन्न मिळत नसे. तिकडे आंबलेले, भीक मागून आणलेले अन्न खाणे हेच त्यांच्या नशिबी होते.

दलित स्त्रियांनाही अत्यंत कष्टमय जीवन जगावे लागत होते, उन्हाळ्यामध्ये लाकडाच्या मोळ्या आणून विकणे, गवताचे भारे आणून विकणे अशा प्रकारची कामे त्यांना करावी लागायची. दलित स्त्रियांची स्थिती अत्यंत हलाखीची होती कष्ट करूनही त्यांना पोटभर अन्न मिळत नव्हते. सवर्णाच्या घरी लग्नकार्य असेल तर त्यांना आठ- दहा दिवस राबवून घेतले जात असे." एरण्या अक्काचं लग्न पुढल्या आठवड्यात हाय, जळण वाळून खड व्हाया पाहिजे तवा आपल्या बांधावरील बाभूळ तोडून घरी आण." [३] लाकूड फाटा आणण्यापासून ते नवरीची घाण काढण्यापर्यंतची सर्व कष्टदायक कामे दलितांना करावी लागत. उपास- तपास दलितांच्या नशिबाला पुजलेले होते. अन्नाची गरज शोधण्यासाठी किंवा खायला जर काही मिळाले नाही तर निवडुंगाची आळी असायची त्यांची लाल कवळी बोंड हे देखील दलित खात असत. भुकेसाठी दुसऱ्या दिवशी होणारा त्रास देखील हे सहन करीत. दलित समाजाच्या दारिद्र्याचे, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, अज्ञान, लाचार, आणि अपमानित जगणे हे त्यांच्या आत्मकथा मध्ये जिवंत साकारतात.

**दलित समाजाविषयीचे सखोल चिंतन-**

जिंण आमुचं या आत्मकथनामध्ये बेबी कांबळे येथील समाजव्यवस्था आणि समाजाविषयीची वाटणारी ओढ, तळमळ व्यक्त केली आहे. खरंच दलित समाज जीवन जगण्यासाठी योग्य होता काय? फक्त जन्म झाला म्हणून माणसाप्रमाणे न जगता पशुप्रमाणे जीवन जगणे त्यांना भाग होते. धार्मिक, रुढी, प्रथा, परंपरा, अंधविश्वास, अज्ञान, यांच्यामध्ये दलित समाज गुरफटलेला होता. म्हणून त्याला यांच्यामधून बाहेर पडण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचार आणि चळवळी यामुळे ते यातून बाहेर पडले. भीक मागने सुद्धा त्यांना भूषण वाटे. शेजारीही दुसऱ्याचा मोठेपणा सांगे" सरू आगं तुझा सासराचा वागूबा होता. मांयदळी त्याला मिळकत. दोन-दोन झोळ्या खाकत भरून ओझाने आख्खी करकर वाकत यायचा बघ अगं शेजारीपाजारी पण त्याच्या अन्नावर जगायची."[४] म्हणून बेबी कांबळे लिहितात की, भीक मागून खाणाऱ्या येसकऱ्यांची काठी त्यांना मोठी मानसन्मानाची वाटे. एवढी लाचारी, अज्ञान, जातीभेद समाजामध्ये होते पण समाजामध्ये सन्मानाची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळेच निर्माण झाली. लेखिका म्हणतात की आम्ही हिंदू धर्माच्या चालीरीती प्राणपलीकडे जपल्या होत्या." हिंदू धर्माची सापडेल ती संस्कृती जपण्याचा आम्ही आटोकाठ प्रयत्न करीत होतो तरी कुणी आम्हाला जाणलेच नाही मन कुठेतरी आशेच्या पालवीत लपल होतं त्या मनालाही गावातील सुख संस्कृती बघून पाटलीनी सारखं वैभव मिळाव."[५] दलितांनी कितीही हिंदूंच्या चालीरीती अवलंबिल्या असल्या तरीही शेवटी दलित म्हणून त्यांचा तिरस्कारच व्हायचा, त्यांची सावली सुद्धा निषिद्ध मानली जायची. म्हणून बेबीताई पुढे म्हणतात" पिढ्यांना पिढ्याचे वाटोळे करून सगळ्या येणाऱ्या पिढ्याचं या समाजाने सोडवून नसून कुजवून टाकल्या तरी हिंदू धर्माला सत्यभावाने जे प्राणापलीकडे जपून त्यांची इमाने इतवारी सेवा करणारे आणि कळेल ते रांगड्या भक्तीने महाराष्ट्राच्या जन्मभूमीची आम्हीच खरे लेकरं आणि या देशाचे वारस आहोत आमची तुम्ही वाटेल त्या मार्गाने रिवडी उडवली आम्ही सर्वस्व गमावलं पण सत्य मात्र गमावलं न्हाय."[६] दारिद्र्यातही आनंद मागून जगणारी जनता होती आणि त्यांचे अज्ञान नष्ट झाल्याशिवाय समाजसुधारणा होणार नाही याची जाणीवही लेखिकेला आहे म्हणून दलित समाजाविषयी त्यांना वाटणारी आपुलकी त्यांच्या चिंतनातून दिसून येते समाजामध्ये असलेले दारिद्र्य, धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा, अज्ञान, लाचार आणि अपमानित जीवन जगणे याविषयी त्यांच्या मनात चिडही दिसून येते आणि त्यामुळे त्यांचे मन चिडून उठते व समाजामध्ये परिवर्तनाची आशा निर्माण

करते.

**डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव-**

ज्या समाजाला माणूस म्हणून जगण्याचे हक्क, सामर्थ दिले, पशुप्रमाणे जगणाऱ्या समाजाला नैतिक बळ दिले ते आंबेडकरांमुळेच. दलित समाजाचा उद्धार झाला त्या महामानवांच्या विचारांचा प्रभाव लेखिकेवर जाणवतो म्हणून लेखिका म्हणतात" आमच्या लाखो पिढ्यांचे बलिदान दुःखात, हालअपेष्टात झाले पण त्याबरोबर शील सत्व भारत मातेच्या पोटात घेऊन विसावले. लाखो पिढ्यांअभावी भूमित माती झाली पण त्यांची नीतिसत्व जमिनीत पसरून सत्य तेजाचा प्रकाशमय अंकुराचं झाड म्हणजेच पिंपळ वृक्ष. तळमळत्या प्राण्यांना गार सावली देणारा, जनावरांना बुद्धी प्रकाश देऊन माणूस करणारा हाच तो आदर्श बुद्ध भीम".[७]

बाबासाहेबांनी पशुवत जीवन जगणाऱ्या समाजाला माणूस म्हणून जगण्याचे बळ दिले त्यांच्या शिकवणुकीमुळेच दलित समाजामध्ये नवजागृती निर्माण झाली व दलित आपल्या हक्कासाठी लढू लागले. आपल्या समाजामध्ये बदल घडवण्याचा प्रयत्न करू लागले. आणि बदलही होऊ लागले दलित समाज शिकून संस्कृत होऊन लागला पण काही दलित समाजातील बुद्धीवादी लोक बाबासाहेबांच्या विचारांपासून दूर होऊ लागले. हिंदूंचे अनुकरण करू लागले उपास – तापास देवदेवता यांची पूजा करू लागले त्यामुळे लेखिकेचे मन व्यतीत होत असताना दिसतात व पुन्हा त्यांचा समाज त्याच मानसिक गुलामगिरी मध्ये जात आहे यांची खंत त्यांच्या मनात निर्माण होते व त्या लिहितात की "सुशिक्षित प्रज्ञा तेवढी बाबांना पुरेपूर विसरली ती आपल्या मोठेपणाच्या तोऱ्यात बाबांना पुरेपूर विसरून देण्याच्या लोळ्या चालू आहेत .आमच्या पोटी जन्मलेली लेकरं इतकी नालायक निघतील असं आम्हाला स्वप्नातही वाटलं नव्हतं पण आजची सत्य परिस्थिती डोळ्यांनी बघून मन घायाळ होतं. काळजाला सुया टोचतात अंतकरण तीळ- तीळ तुटतं, पिळवटलेल्या आतड्यातून शब्द ओठांवर रेगाळतात आणि हळूहळू बाहेर पडतात, अखेर आम्ही जन्म बांडगुळांनाच दिला "[८]

अशाप्रकारे ज्या समाजाने दलित वर्गाला नाकारले ,वेदना दिल्या, माणूस म्हणून जगण्याचे हक्क नाकारले त्याच वर्गाचे अनुकरण करायला हा दलित समाज निघाला आहे यातून आपल्या समाजाविषयीची तळमळ बेबी कांबळे यांच्या आत्मकथनातून दिसून येते.

**निष्कर्ष-**

१) बेबी कांबळे यांनी लिहिलेलं जिंण आमुचं हे आत्मकथन इतर दलित स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनापेक्षा वेगळी आहे.

२) जिंण आमचं या आत्मकथनामध्ये त्यांनी स्वतः उपभोगलेल्या दुःखाबरोबरच आपल्या समाजाचे दुःख अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे.

३) बेबी कांबळे हया स्वतः दलित समाजामध्ये जन्मल्या असल्याने त्यांनी आपल्या आत्मकथनात दलित समाजाचे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण केले तसेच विशेषतः दलित समाजातील स्त्रियांचे दुःख अत्यंत प्रभावीपणे व हुबेहूब असे मानले आहे.

४) या आत्मकथनात माहेरच्या लोकांविषयी उल्लेख करतात परंतु सासरच्या मंडळीचा उल्लेख आत्मकथनात केलेला नाही.

५) बेबी कांबळे यांनी आपल्या आत्मकथनामध्ये बोलीभाषेचा व प्रमाण भाषेचा वापर केलेला आढळून

येतो.

**संदर्भसूची -**


- फडके भालचंद्र, दलित साहित्य विद्रोह व वेदना, श्री विद्या प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती २००० पृ. क्र. २७.
- चौगुले डॉ. वि. स., आस्वाद आणि आलेख, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती २००२, पृ. क्र. १४७.
- कांबळे बेबी, जिंण आमचं, वेदविद्या मुद्रणालय पुणे १९८६, पृ. क्र. ७४.
- तत्रैव - पृ. क्र.१७.
- तत्रैव - पृ. क्र.१८.
- तत्रैव - पृ. क्र.३६.
- तत्रैव - पृ. क्र.१२३.
- तत्रैव - पृ. क्र.१२४.